adani
Electricity

**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: अदाणी हाऊस, ५६, श्रीमाली सोसायटी,
मिठाकाली सिक्स रोड जवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात ३८० ००९, भारत.
वेबसाईट: www.adanielectricity.com
CIN: U74999GJ2008PLC107256

# सार्वजनिक सूचना

**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या, ११ ऑगस्ट, २०११ दिनांकित वितरण परवाना २०११ क्र. १ च्या अनुभाग ५.२ व पारेषण परवाना २०११ क्र. १ च्या अनुभाग ५.२ आणि आयोगाने पारित केलेल्या, २०१७ चे प्रकरण क्र. १३९ व २०१७ चे प्रकरण क्र.१४० मधील २८ जून, २०१८ दिनांकित आदेश यांच्या अंतर्गत, कंपनीच्या भागधारक रचनेतील (पॅटर्न मधील) प्रस्तावित बदलांसाठीच्या याचिकेवर सूचना/आक्षेप. (२०१९ चे प्रकरण क्र. ३४१ आणि ३४२)**

१. अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) यांनी, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (आयोग) यांच्यापुढे, ११ ऑगस्ट, २०११ दिनांकित वितरण परवाना २०११ क्र. १ च्या अनुभाग ५.२ अंतर्गत आणि ११ ऑगस्ट, २०११ दिनांकित पारेषण परवाना २०११ क्र. १ च्या अनुभाग ५.२ अंतर्गत आणि आयोगाने जारी केलेल्या त्यांच्या २०१७ चे प्रकरण क्र. १३९ आणि २०१७ चे प्रकरण क्र. १४० मधील २८ जून, २०१८ दिनांकित आदेशातील निर्देशां अंतर्गत, कंपनीच्या भागधारक रचनेतील (पॅटर्न मधील) प्रस्तावित बदलांची नोंद घेण्याची प्रार्थना करण्यासाठी याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने २४ डिसेंबर, २०१९ रोजी याचिका दाखल करून घेतली आहे आणि एईएमएल यांना, या सूचनेद्वारे जनतेकडून सूचना/ आक्षेप मागवणारी एक सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेची ठळक वैशिष्ट्ये:

अ. कतार होल्डिंग एलएलसी ही कतार इन्व्हेस्टमेंट ऑथॉरिटी यांच्या संपूर्णतया मालकीची एक गुंतवणूक कंपनी आहे आणि तिने अदाणी ट्रान्समिशन लिमिटेड (एटीएल) यांच्याकडून एईएमएल च्या एकूण समभाग भांडवलाचे २५.१% हस्तगत /प्राप्त करण्यासाठी एका निश्चित करारावर हस्ताक्षर केलेले आहे.

ब. प्रस्तावित व्यवहार पूर्ण झाल्यावर सुद्धा एटीएल हे एईएमएल चे प्रमुख समभागधारक राहतील आणि व्यवस्थापकीय नियंत्रण देखील त्यांच्याचकडे राहील.

क. आयोगाच्या नियामाअंतर्गत, एईएमएल वितरण/पारेषण व्यापाराची मालकी, संचालन आणि देखभाल करीत राहील.

ड. प्रस्तावित व्यवहारामुळे वीजदरावर कोणताही विपरीत प्रभाव पडणार नाही, कारण वीजदर हा नियमित लेखा पुस्तकांच्या आधारे ठरवणे चालू राहील.

४. याचिकेच्या प्रती लेखी विनंतीवरून एईएमएल च्या कार्यालयातून प्राप्त केल्या जाऊ शकतील:

अ. तपशीलवार याचिका दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) (रोख किंवा ''अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड'' यांच्या नावे, मुंबई येथे देय डीडी/ धनादेशाकरवी रु १००/– चा भरणा केल्यावर).

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी क्रमांक/ फॅक्स क्रमांक | ई–मेल |
|---|---|---|---|
| कार्यालय | श्री. किशोर पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष – व्यवसाय नियामक<br>अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, सीटीएस ४०७ / ए (नवीन), ४०८ (जुना), गाव एकसर, देवीदास लेन, एसव्हीपी रोड जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३ | दूरध्वनी क्रमांक: ३००९९९९९<br>फॅक्स क्रमांक: ३००९८५५७ | kishor.patil@adani.com |

५. आयोगाने एईएमएल यांना, त्यांच्या याचिकेवर या सूचने द्वारे जनतेकडून सूचना/ आक्षेप मागविण्याचे निर्देश दिले आहेत, जे श्री. किशोर पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष – व्यवसाय नियामक, अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, सीटीएस ४०७/अ (नवे), ४०८ (जुने), एक्सर गाव, देविदास गल्ली, एसपीव्ही मार्गावर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३ (फॅक्स: ३००९८५५७, ईमेल: kishor.patil@adani.com) यांना पाठविलेल्या पुराव्यासह **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला, केंद्र क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४०० ००५ यांना, किंवा फॅक्सद्वारे (फॅक्स: ०२२ २२१६३९७६), किंवा ई–मेलने** (mercindia@merc.gov.in) **सोमवार, २० जानेवारी २०२० पर्यंत पाठवावे.**

६. सूचना/ आक्षेप नोंदवण्यास इच्छुक प्रत्येक व्यक्तीने त्या इंग्रजी किंवा मराठीतून, सहा (१+५) प्रतींमध्ये, व्यक्तिगत स्वरूपात किंवा टपालाने किंवा फॅक्सद्वारे किंवा ई–मेलने सादर कराव्या आणि पाठवणाऱ्याचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ई–मेल पत्ता, असल्यास, यांचा उल्लेख करावा. या सूचना/ आक्षेप कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकवर्गाच्या वतीने दाखल करण्यात येत असतील, तर तसेही सूचित करावे. तसेच, पाठवणाऱ्याला व्यक्तिगत स्वरूपात आपले म्हणणे मांडावयाचे असेल, तर तसाही उल्लेख करावा, **आयोगाच्या कार्यालयात १३वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर १, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४०० ००५ येथे मंगळवार, २८ जानेवारी, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित केल्या जाणाऱ्या सार्वजनिक सुनावणीच्या वेळी** तशी त्यांना संधी दिली जाईल, ज्यासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही.

७. प्रत्येक प्राप्त सूचना/आक्षेपांना एईएमएल, ते प्राप्त झाल्याच्या तीन दिवसांत उत्तर देतील. **सोमवार, २० जानेवारी, २०२०** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना/ आक्षेपांना **गुरुवार, २३ जानेवारी, २०२०** पर्यंत उत्तर दिले जाईल. एईएमएल यांनी दिलेल्या उत्तरांना भागधारक सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा उशीरात उशीरा **गुरुवार, ३० जानेवारी, २०२०** पर्यंत प्रत्युत्तर सादर करू शकतील.

८. याचिका एईएमएल यांच्या संकेतस्थळावर https://www.adanielectricity.com/Regulatory येथे उपलब्ध आहेत.

स्थळ: मुंबई
तारीख: ३० डिसेंबर, २०१९

सही/
किशोर पाटील
अधिकृत हस्ताक्षरकर्ते